**<u>निशाणी क्र. २९ कडील आदेश</u>**

प्रस्तूतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम ९ नुसार दावा मिळकतीवर प्रतिवादीने केलेले अतिक्रमण मोजण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करण्याकरीता दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, दवा मिळकत मौजे कोल मांडला येथील गट नं. १२/२००२ क्षेत्र ०-५२-५ हे.आर ही मिळकत वडीलोपार्जीत असून नोंदणीकृत वाटपपत्राद्वारे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये समान वाटप झालेले आहे. त्यानुसार वादीस दक्षिणेकडील ०.२६-२५ हे. आर तर प्रतिवादी क्र. १ या उत्तरेकडील ०-.२६-२५ हे. आर एवढी मिळकत देण्यात आली आहे. परंतू, प्रतिवादीने वादीच्या मालकीच्या क्षेत्रामध्ये अतिक्रमण करुन भात पिकाची लागवड करुन उत्पन्न घेणार असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादीने आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तूत प्रकरण मनाई हुकूमाच्या अर्जावरील सुनावणीसाठी प्रलंबित असून वादीने मनाई हुकूमाचा अर्ज उपलब्ध कागदपत्राद्वारे शाबीत करणे आवश्यक असतांना सुध्दा प्रस्तूतचा अर्ज केवळ पुरावा गोळा करण्यासाठी दाखल केला असल्यामुळे त्यांनी प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

२. वादी तर्फे विद्वान वकील श्री. पी. ए. केने व प्रतिवादी तर्फे विद्वान वकील श्री. ए. व्ही. देशपांडे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूतचा दावा मालकी हक्काबाबत ठराव करुन मिळण्यासाठी आणि निरंतर ताकीदीसाठी दाखल करण्यात आला असून निशाणी क्र. ५ कडील वादीचा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज आणि निशाणी क्र. १९ कडील प्रतिवादीचा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज प्रलंबित असतांना प्रस्तूतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. या अनुषंगाने प्रतिवादी तर्फे आधार घेण्यात आलेल्या निशाणी क्र. ३२ कडील कागदपत्राच्या यादीसह सादर करण्यात आलेल्या ना. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या Gangaram Baban Tagad & Others Vs Sarubai Yashwant Tagad & Others [रिट

पिटीशन नं.६७००/२०११ (निकाल दिनांक १२/०६/२०१३)] या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. ज्यामध्ये ना. उच्च न्यायालय यांनी 6. "Exh.5 i.e. temporary injunction application is not yet decided. The said application is to be decided on the basis of prima facie case. The defendant has moved the application for appointment of Court Commissioner. It is for the plaintiff to prove his own case. If after the evidence is recorded, the Court finds it necessary to appoint Commissioner for proper disposal of the case, the Court at that stage can consider the application for appointment of Court Commissioner. It would be premature to consider the application U/o XXVI Rule 9 of the C.P.C., at this stage i.e. prior to decision on Exh.5. It is for the plaintiff to prove prima facie case, balance of convenience and irreparable loss." असे ग्राहय धरले आहे. उपरोक्त ना. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या Gangaram Baban Tagad & Others Vs Sarubai Yashwant Tagad & Others हा न्यायनिर्णय लागू पडतो. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज अकाली असल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे मनाई हुकूमाचे अर्ज अभिलेखावर उपलब्ध पुराव्यावरुन निकाली काढले जाणे अपेक्षीत आहे. सुनावणीच्या या टप्प्यावर न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करणे न्यायोचित ठरणार नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करतो -

## आदेश

१. अर्ज फेटाळण्यात येतो.

२. पक्षकारांनी अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : १०/०७/२०२३

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड